**प्रादेशिक योजना- पुणे**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(४) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत...

मौजे नानोली तर्फे चाकण ता.मावळ जि.पुणे येथील गट नं.१०३/२ व १०३/३ या मधील एकूण ११.६६ हेक्टर क्षेत्र "वनीकरण" विभागातून वगळून "औद्योगीक" विभागात समाविष्ट करणेबाबत.

17 FEB 2025

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**सहसंचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,**
२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे - ०१.

निर्णय क्र. प्रा.यो.पुणे/कलम-२० (४)/ मौजे नानोली तर्फे चाकण /ता. मावळ/ग.नं.१०३/२ व १०३/३ इतर/सहसंपुवि/९८५ दिनांक-१३ फेब्रुवारी, २०२५.

**निर्णय** :- सोबतची अधिसूचना (मराठी/इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

(रा.म.पवार)
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे

प्रति,

१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे तथा मा. अध्यक्ष, प्रस्ताव छाननी समिती
२) मा.जिल्हाधिकारी,पुणे
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे.
४) उपसंचालक, नागरी संशोधन घटक,पुणे.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.)
५) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
(प्रस्तुत प्रकरणी छाननी समितीच्या उक्त निर्णयानुसार अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या ५ प्रती त्वरीत सादर कराव्यात.)
६) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.
/-त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात पुणे विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवाव्यात.
७) अवर सचिव, नगर विकास विभाग (नवि-१३), मंत्रालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**सहसंचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,**

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे - ०१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:**

क्रमांकः प्रा.यो.पुणे/कलम-२० (४)/ मौजे नानोली तर्फे चाकण /ता. मावळ/ग.नं.१०३/२ व १०३/३ इतर /सहसंपुवि/१९५ दिनांक-१३ फेब्रुवारी, २०२४.

ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम-१५४ अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे नानोली तर्फ चाकण, ता.मावळ, जि.पुणे येथील ग.नं.१०३/२,१०३/३ मधील ११ हे. ६६ आर क्षेत्र (यापुढे ज्यास "उक्त जमीन" असे संबोधलेले आहे.) वनिकरण विभागातून वगळून औद्योगिक विभागात समाविष्ट करण्याबाबत मे.इंडो ग्लोबल इंडस्ट्रीयल पार्क एलएलपी तर्फे संजिव चमनलाल अरोरा, श्री.तुकाराम सावळेराम दाभाडे, श्री.गोरख सावळेराम दाभाडे, श्री.ज्ञानेश्वर सावळेराम दाभाडे, श्री.नामदेव सावळेराम दाभाडे व श्री.संदीप विष्णू दाभाडे यांनी दि.२७.०६.२०२४ रोजी या कार्यालयास विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सुचना क्र.प्रा.यो.पुणे/कलम-२०(३)/मौजे नानोली तर्फे चाकण /ता.मावळ/ग.नं.१०३ पै व इतर/सहसंपुवि/१५७१,दि.१८.०९.२०२४ अन्वये, उक्त क्षेत्र 'औद्योगीक' विभागात समाविष्ट करणे करीता राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) अन्वयेच्या सूचनेस अनुसरुन प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतींवर संबंधिताना सुनावणी देऊन अहवाल सादर करणेकरिता सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांना नियुक्त करण्यात आले होते. (या पुढे ज्यास "उक्त अधिकारी" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने संपुर्ण वैधानिक कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून, सदर फेरबदलाबाबत विहित मुदतीत एकही हरकत / सूचना प्राप्त नसल्याचे उक्त अधिकारी यांनी कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, दि.२८.०१.२०२५ रोजीचे प्रस्ताव छाननी समितीच्या बैठकीत सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार व काही अटींसापेक्ष उक्त क्षेत्र 'वनिकरण' विभागातून वगळून 'औद्योगीक' विभागात समाविष्ट करणेचा निर्णय "प्रस्ताव छाननी समिती" चे बैठकीमध्ये झालेला आहे;

आणि ज्याअर्थी, जमीनधारकांनी या संबंधाने आवश्यक छाननी शुल्क, प्रसिद्धी शुल्क व अधिमूल्य रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात केला आहे;

आता त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, सहसंचालक नगर रचना, पुणे विभाग पुणे हे उक्त अधिनियमाचे कलम २० पोट कलम ४ अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलास मंजूरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजूरीच्या दि.२५.११.१९९७ च्या अधिसूचने सोबत जोडलेल्या

फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये, शेवटच्या नोंदी नंतर, खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निर्देश देत आहे.

## नोंद

पुणे जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक योजनेतील मौजे नानोली तर्फे चाकण, ता.मावळ, जि.पुणे येथील ग.नं. १०३/२,१०३/३ मधील ११ हे. ६६ आर क्षेत्र जमिनीचा वापर, सोबतच्या भाग नकाशांत दर्शविल्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून 'वनिकरण' विभागातून वगळून ऐवजी 'औद्योगीक' विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अटी:-**

१) शासन निर्णय दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ तसेच या अनुषंगीक शासन निर्णयातील सर्व अटी / शर्ती जमिनधारक / विकसकावर बंधनकारक राहतील.

२) जिल्हाधिकारी, पुणे, मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रा.वि.पुणे, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रा.वि. पुणे, मुख्य अभियंता जलसंपदा प्रा.वि.पुणे, सहायक संचालक, नगर रचना,पुणे शाखा या कार्यालयांचे अनुक्रमे दि.१५.०१.२०२४, दि. ०९.०१.२०२४, दि. १९.०१.२०२४, दि. ०९.०२.२०२४, दि. ०८.०२.२०२४ रोजीच्या पत्रातील अटी जमिनधारक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

३) फ़ेरबदलाखालील क्षेत्राच्या १०% क्षेत्र हे औद्योगिक सुविधा भूखंड स्वरुपात राखुन ठेवणे व मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार औद्योगिक सुविधेच्या अनुषंगाने अनुज्ञेय वापराकरिता विकसीत करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

४) सदर प्रस्ताव सादर करतेवेळी दि.०६.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे अनुसूची 'क' नुसार दि.२०.११.२०२३ रोजी सादर केलेल्या हमीपत्रानुसार मान्य अटींचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

मंजूर फेरबदला खालील जमिनी दर्शविणारा भाग नकाशा, सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांचे कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

प्रस्तुत अधिसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(रा.म.पवार)
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे

# Government of Maharashtra

**Urban Development Department**

**Office of the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune**
**212, Second Floor, New Administrative Building, Opp. Council Hall, Pune – 411001.**

**NOTIFICATION**

**The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Notice No. R.P.Pune/Sect.20 (4)/Mouze Nanoli Tarf Chakan/Tal- Maval/Gat.No.103/2 & 103/3 /JDTP Pune/ 195 Date: 13 Feb 2024

Whereas, the Government vide Resolution No.TPS 1815/CR-49/15/UD-13 dated 06.05.2015 and 04.01.2016 has issued directives under Section 154 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred as "the said Act") regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land falling in the areas of sanctioned Regional Plans under the said Act in the State;

And whereas, Shri. Sanjeev Chamanlal Arora on behalf of Indo Global Industrial Park LLP., Shri.Tukaram Savaleram Dabhade, Shri.Gorakh Savaleram Dabhade, Shri.Dnyaneshwar Savaleram Dabhade, Shri.Namdev Savaleram Dabhade and Shri.Sandeep Vishnu Dabhade has requested this office vide letter dated 26.06.2024 to delete an area admeasuring about 11.66 hectare of Mauje Nanoli tarfe Chakan, Tal. Maval, District Pune, G.No. 103/2 and 103/3; (hereinafter referred to as "the said land") from 'Afforestation Zone and include in Industrial Zone' in the said Regional Plan;

And whereas, a Notice No. Notice No. R.P.Pune/Sect.20 (3)/Mouze Nanoli Tarfe Chakan/Tal- Maval/Gat.No.103P&others/JDTP Pune/1571, Dated 18.09.2024 has been published under Section 20(3) of the said Act, for inviting suggestions and objections for including the said land into 'Industrial' Zone and authorised the Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune (hereinafter referred to as the "said Officer") to submit a report after giving hearing to the suggestions /objections so received in response to the notice u/s 20(3) of the said Act, to be published in Maharashtra Government Gazettee as well as local newspapers;

And whereas, the said Officer had submitted a report stating that all legal procedure stipulated in the said Act had been completed and no suggestions/ objections had been received within the stipulated period about the said modification;

And whereas, after considering the report submitted by the said Officer in its meeting dated 05.09.2024, the Proposal Scrutiny Committee has made a decision to include the said land into 'Industrial Zone' as shown on plan subject to certain conditions;

And whereas, the said land owners have paid the requisite processing fees, advertisement charges and Premium in the Government Treasury;

Now therefore, under the powers delegated by the Government, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune hereby sanction the modification under sub section 4 of Section 20 of the said Act and for that purpose directs that in the Schedule of Modifications appended to the Notification dated 25.11.1997 sanctioning the said Regional Plan, after the last entry, the following new entry shall be added;

## ENTRY

In the Sanctioned Regional Plan of Pune the allocation of the area admeasuring about 11.66 hectare in land bearing G.No.103/2 and103/3 of Mauje Nanoli tarfe Chakan, Tal. Maval, District Pune is deleted from 'Afforestation Zone' and included in 'Industrial Zone' as shown on the plan, subject to the following conditions.

**Conditions:-**

1) The terms and conditions laid down in Government Resolution dt. 06.05.2015 & 04.01.2016 are binding on the landowner/developer.
2) The terms and conditions prescribed by Collector, Pune, Maharashtra Jivan Pradhikaran, Regional Division, Pune, Chief Engineer, Public Works Regional Division, Pune, Chief Engineer, Irrigation Regional Division, Pune, Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune vide letter dated dt.15.01.2024, dt.09.01.2024, dt.19.01.2024, dt.09.02.2024& dt.08.02.2024, respectively shall remain binding on the landholder/developer.
3) It shall be mandatory to provide 10% Amenity Space and develop it as per permissible uses according to Industrial use as mentioned in Sanctioned Development Control and Promotion Regulations (DCPR).
4) The terms and conditions accepted by the applicant vide the affidavit submitted on dated 26.10.2020 as per Annexure 'C' of the said Government Resolution dated 20.11.2022 shall be binding on the applicant.

The Part Plan showing the lands under the sanctioned modification shall be made available for inspection to the general public, in the office of Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune.

This Notification is also available on website www.dtp.maharashtra.gov.in.

**(R.M.Pawar)**
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee
And
Joint Director of Town Planning,
Pune Division, Pune